# THE DISTRICT IN MAHARASHTRA

FIG 2




FIG 3




H-7470.P.Z.P. POONA-1962

# SHOLAPUR DISTRICT



# प्र स्ता व ना

## प्रस्तावना :

राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासात, जसे वर्तनवादी अभ्यासपध्दतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे विश्लेषणात्मक अभ्यासपध्दती आणि विभागीय अभ्यासाला समान महत्त्व असल्याचे दिसून येते. किंबहुना भारतातील राजकीय क्रिया - प्रक्रिया आणि व्यवहार यांच्या अभ्यासात विभागीय अभ्यासाला ( *Area studies* ) अनन्यसाधारण महत्व असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय जीवनातील राजकीय स्थित्यंत-रांचा आणि क्रिया-प्रक्रियांचा अभ्यास करीत असताना स्वातंत्र्यानंतर संचालित केल्या गेलेल्या विकास-प्रक्रिया आणि समाजजीवनात निर्माण झालेली विविधांगी राजकीय स्पर्धा व आंदोलने, संविधानाच्या आधुनिक प्रणालीतून निर्माण झालेल्या क्रिया-प्रतिक्रिया यांचा विचार केल्याशिवाय आधुनिक भारताच्या राजकीय घडामोडीची व राजकीय वर्तनाची योग्य मिमांसा करता येत नाही. त्यासाठी सैध्दान्तिक पातळीवरील संदिग्ध व सर्वसमावेशक विधाने फारशी उपयुक्त ठरत नाहीत. विभागीय पातळीवरील घडामोडी, राजकीय क्रिया, वर्तन, समाजजीवनात निर्माण झालेली आंदोलने यांचे विश्लेषण स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलत्या राजकीय प्रक्रिया आणि वर्तनाच्या आकलनाला उपयुक्त ठरते. त्या जाणिवेतून सोलापूर जिल्ह्याचा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सहभाग हा प्रकल्प हाती घेतलेला आहे.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील एक प्रमुख आणि आपल्या समाजजीवनावर दूरगामी परिणाम करणारी चळवळ होती. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात महाराष्ट्राचे सर्व राजकीय जीवन ढवळून निघाले. जनसामान्यांच्या आणि बहुजन समाजाच्या इच्छा-आकांक्षा या आंदोलनाच्या रूपाने मांडल्या गेल्या. त्यात सोलापूर शहर आणि जिल्हा

हे महाराष्ट्राच्या सीमाभागावरील प्रदेश असल्याने सीमावादाचे परिणाम देखील त्यावर झालेले दिसून येतात. म्हणून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे व सीमावादाचे सोलापूरवर झालेल्या परिणामांचा अभ्यास हा स्वातंत्र्योत्तर मराठी जीवणातील ताणतणावांचा अभ्यास आहे. हे ताण-तणाव समजून घेणे म्हणजेच महाराष्ट्रातील जन-आंदोलनाचा अभ्यास करणे, याच हेतूने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

........